दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २४९ वा ▶ बुधवार दि. ५ जुलै २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

## राज्यात घाणेरड्या राजकारणाची सुरुवात पवारांनीच केली; ठाकरें



**मुंबई ।** राज्यात झालेल्या सत्तानाट्यानंतर राज ठाकरे यांनी शरद पवारांवर हल्लाबोल केला आहे. राज्यात घाणेरड्या राजकारणाची सुरुवात शरद पवारांनीच केली असल्याचं ते म्हणाले. महाराष्ट्रात कोण कोणत्या पक्षात आहे याचं उत्तरच देता येत नाही आहे. फक्त मनसेचेच कार्यकर्ते ठामपणे सांगू शकतात की, मी मनसेचा आहे. बाकी पक्षात तर फुट पडल्याने कोण कोणत्या पक्षाचं आहे हे सांगता येत नाही. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाची दुर्दैवी परिस्थिती आहे, असं म्हणत भाष्य केलं आहे.

# पळासनेरनजीक भीषण अपघात, १२ जण ठार, २४ जखमी

**धुळे । प्रतिनिधी**

मुंबई -आग्रा राष्टीय महामार्गावरील शिरपूर तालुक्यातील पळासनेरनजीक आज भीषण अपघात झाला. खडी घेऊन जाणाऱ्या भरधाव कंटेनरचे ब्रेक फेल झाल्याने दुचाकी, कारला उडवत थेट हॉटेलमध्ये शिरला. या अपघातात १२ जण ठार झाले असून २४ जण जखमी झाले आहेत. दरम्यान, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

दि ४ रोजी  १२ वाजेच्या सुमारास हा भीषण अपघात झाला. जे ०९ जीबी ९००१ क्रमांकाचा कंटेनर हा मध्यप्रदेश राज्यातून खडी घेऊन जिल्ह्यातील नरडाणा एमआयडीसी येथे येत होता. पळासनेर गावानजीक अचानक ब्रेक फेल झाल्याने चालकाचा कंटेनर वरील ताबा सुटला. त्यानंतर कंटेनर रस्त्यावरील वाहनांना व नागरिकांना उडवीत थेट हॉटेलमध्ये शिरून उलटला. या भीषण अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच नागरिकांनी व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य केले. जखमींना तात्काळ जवळील व शिरपूर उपजिल्हा रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. जखमींमध्ये काहींची प्रकृती गंभीर आहे. दरम्यान पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. मुंबई-आग्रा महामार्गावर शिरपूर तालुक्यातील पळासनेर हे गाव मध्य प्रदेशच्या सीमेवर येतं. याच गावाजवळ साधारणतः दुपारी १२ वाजताच्या दरम्यान ही अपघाताची घटना घडली. एक कंटेनर महामार्गावरुन जात असताना त्याचा ब्रेक फेल झाला आणि तो थेट हॉटेलमध्ये शिरला. या भीषण अपघातात १२ जणांचा जागीच मृत्यू झाला असून २४जण जखमी झाले आहेत. सध्या अपघातस्थळी मदतकार्य सुरू आहे. जखमींना तात्काळ स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.  प्राथमिक माहितीनुसार, महामार्गावरुन जाणाऱ्या कंटेनरचा ब्रेक फेल झाला आणि तो थेट रस्त्याच्या कडेला असणाऱ्या हॉटेलमध्ये शिरला. या अपघातात आधी पाच जणांचा जागीच चिरडून मृत्यू झाला होता. तर अनेकजण जखमी झाल्याची माहिती मिळत होती.





## भरधाव कंटेनर थेट घुसला हॉटेलमध्ये





### उतारावर ब्रेक फेल झाल्याची माहिती

यासंबंधीच्या माहितीनुसार, महाराष्ट्र व मध्य प्रदेश राज्याच्या सीमेवर सातपुडा पर्वत रागांच्या जवळ असलेल्या भागात मोठा उतार आहे. या उतारावर मध्य प्रदेशातून महाराष्ट्राच्या दिशेने येणाऱ्या या कंटेनरचे ब्रेक फेल झाले होते. त्यानंतर हा कंटेनर थेट पळासनेर गावाजवळ असलेल्या हॉटेलमध्ये घुसला. या कंटेनरने अन्य काही काही वाहनांनाही धडक दिल्याचे वृत्त आहे. त्यामुळे गाडीतील काही जणांचाही मृत्यू झाल्याचे वृत्त आहे.

### रुग्णालयात जिल्हाधिकारी जलज शर्मा व आ पावरा यांची भेट

धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील पळासनेर फाट्यावर ब्रेक नादुरुस्त झाल्याने कंटेनर हॉटेलमध्ये घुसून झालेल्या अपघातात झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच आमदार काशिराम पावरा, जिल्हाधिकारी जलज शर्मा, पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, प्रांताधिकारी प्रमोद भामरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. अपघातातील जखमींवर शिरपूर व धुळे येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. राज्याचे ग्रामविकास पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याणमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गिरीष महाजन यांनी रुग्णालयात जाऊन आस्थेवाईकपणे चौकशी केली. तसेच नातेकांना धीर दिला.  या अपघातातील वाहनचालकाचाही मृत्यु झाला आहे. अपघाताच्या कारणाचा तपास सुरु असून या अपघाताची माहिती शासनास कळविण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांनी दिली. अपघातातील जखमींची आमदार काशिराम पावरा आणि जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी शिरपुर रुग्णालयात जाऊन आस्थेवाईकपणे चौकशी केली. जखमींवर योग्य ते उपचार करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.



### भरधाव वेगाने कंटेनर थेट हॉटेलमध्येच शिरला

मुंबई-आग्रा महामार्गावरून कंटेनर भरधाव वेगाने जात होता. चालकाचं नियंत्रण सुटल्यानंतर रस्त्याच्या कडेला असलेल्या हॉटेलमध्ये कंटेनर घुसला. हॉटेलबाहेर अनेक वाहने उभी होती. हा कंटेनर वाहानांना उडवून हॉटेलमध्ये घुसला. यामुळे अनेक वाहनांच नुकसान झालं आहे. जखमींवर उपचार सुरू झाले आहेत. पोलिसांचे पथक बचाव कार्यात गुंतले आहे.

### जखमींपैकी काहींची प्रकृती चिंताजनक

अपघाताची माहिती मिळताच आसपासच्या गावातील लोक घटनास्थळी जमा झाले. यानंतर अग्नीशमन दल आणि पोलिसांनी घटनेची माहिती देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्नीशमन दल घटनास्थळी दाखल झाले. स्थानिकांच्या मदतीने तात्काळ बचावकार्य सुरु करण्यात आले. या अपघातात २८ जण जखमी झाले आहेत. जखमींवर नजीकच्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत. जखमींपैकी काहींची प्रकृती चिंताजनक आहे. मुंबई-गोवा महामार्गावरुन बांधकाम साहित्य घेऊन जाणारा भरधाव कंटेनर चालला होता. धुळ्यातील पळासनेरजवळ ब्रेक फेल झाला. यानंतर कंटेनर अनियंत्रित झाला आणि रस्त्यावर उभ्या वाहनांना उडवत हॉटेलमध्ये घुसला. अचानक घडलेल्या या घटनेने महामार्गावर एकच हाहा:कार उडाला. अपघाताची घटना घडताच स्थानिक लोक मदतीला धावून आले आणि लोकांना बाहेर काढण्यास सुरवात केली. सर्व मतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. जखमींना उपचारासाठी तात्काळ रुग्णालयात दाखल केले आहे. मयतांची ओळख पटवण्याचे काम सुरु आहे.

### अपघातातील मृतांची नावे

प्रतापसिंग भिमसिंग गिरासे (७०) रा.पळासनेर, गीता मुरी पावरा (१५) रा.कोळसापाणीपाडा, मोयदा पो.पळासनेर, मुरी सुरसिंग पावरा (२८), रा.कोळसापाणीपाडा, मोयदा पो.पळासनेर, संजय जायमल पावरा (३८) रा.कोळसापाणीपाडा, रितेश संजय पावरा (१०) रा.कोळसापाणीपाडा, पळासनेर, पंकज पावरा (७) रा. कोळसापाणीपाडा, सुनिता राजेश खंडेलवाल रा.गणपती मंदिराजवळ, जीटीपी स्टॉप, धुळे, कन्हैय्यालाल बंजारा रा.जावदा ता.निंबाहेडा जि.भिलवाडा, सुरपालसिंग जवानसिंग राजपूत रा.जावदा ता.निंबाहेडा जि.भिलवाडा, किरमा डबरा कनोजे (१३) रा.अंबापाणी ता.शिरपूर यांचा समावेश आहे.

### जखमींमध्ये यांचा आहे समावेश!

लाली छगन पावरा रा.पोलकी वरला जि.बडवानी, म.प्र., केरला डेबरा पावरा रा.अंबापाणी, बीजलान दारासिंग पावरा (सद्गुरु हॉटेलचालक) रा.शेमल्या, ता.शिरपूर, दशरथ कमल पावरा (२२), दिनेश नारशा पावरा, गीता पावरा (१५), ललिता रमेश पावरा, अनिता पावरा, दिपक जगन पावरा, नंदीनी पावरा (१५), अजय पावरा रा.कोळसापाणी, निलेश पावरा रा.बडवानी, असलम खान (५०) रा.छोटा नांदगाव, सुमित्रा खंडू पावरा (३५) रा.कोळसापाणी, अमरसिंग पावरा (२२) रा.अंबापाणी, अर्जून पावरा (१३) रा.कोळसापाणी, हसम खान (४०) रा.मेवाड, हरियाणा, हेमराज जाधव (४२) रा.नाशिक, राजेश खंडेलवाल, शुभम खंडेलवाल, रजत राजेश खंडेलवाल रा.धुळे, कमलेश चव्हाण (२१) रा.अंबापाणी आदींचा समावेश आहे.

### मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखांची मदत

जिल्ह्यातील पळासनेर येथे मुंबई- आग्रा महामार्गावर झालेल्या भीषण अपघाताबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शोक व्यक्त केला आहे.  या अपघातातील मृत आणि त्यांच्या कुटुंबियाप्रति सहवेदना प्रकट करुन या दुर्दैवी घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीमधून प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी जाहीर केली आहे. या अपघाताची माहिती मिळताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धुळे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांशी दूरध्वनीवर संपर्क साधून या घटनेची माहिती घेतली. अपघातग्रस्तांना तातडीने मदत करण्याच्या सूचना देतानाच जखमींना तात्काळ वैद्यकीय उपचार पुरविण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

## जिल्हाधिकाऱ्यांनी केली शासन आपल्या दारी कार्यक्रमस्थळाची पाहणी

**धुळे । प्रतिनिधी**



शासन आपल्या दारी३९; अभियानांतर्गत धुळे येथे जिल्हास्तरीय कार्यक्रम सोमवार, १० जुलै, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थित होणार आहे. या कार्यक्रमाचा मुख्य समारंभ एसआरपीएफ मैदान, धुळे येथे होणार आहे.

जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी आज सकाळी या ठिकाणाची पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी बुवनेश्वरी एस., जिल्हा पोलिस अधीक्षक संजय बारकुंड, मनपा आयुक्त देविदास टेकाळे, अप्पर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता विवेक नवले, एसआरपीएफचे सहाय्यक समादेशक चंद्रकांत पारसकर, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता आर. आर. पाटील, जिल्हा नगरपालिका प्रशासन अधिकारी शिल्पा नाईक, आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी मुख्य सभा मंडप, मान्यवर पार्किंग, त्याचबरोबर लाभार्थ्यांची बैठक व्यवस्था, जिल्ह्यातील सरपंचांची बैठक व्यवस्था, शासकीय विभागांमार्फत तसेच बचतगटामार्फत लावण्यात येणारे विविध स्टॉल, वाहन पार्कींग व्यवस्था, हेलीपॅड आदी भागांची पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांनी लाभार्थ्यांना कार्यक्रमाच्या ठिकाणी कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये याकरिता आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याच्या सूचना सर्व विभागाच्या संबंधितांना दिल्या.

## अभिजित रवींद्र इंगळेंची पीएसआय पदी निवड

**धुळे । प्रतिनिधी**



धुळे शहरातील अभिजित इंगळे हे एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाले असून त्यांची शासनातर्फे पीएसआय म्हणून निवड करण्यात आली आहे. अभिजित हे धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष, जेष्ठ पत्रकार रवींद्र नामदेव इंगळे यांचे चिरंजीव आहेत. त्यांनी यापूर्वीही स्पर्धा परीक्षांमध्ये अभ्यासावर प्रचंड लक्ष केंद्रित करून यश मिळविले आहे.

एमपीएससी तर्फे सन २०२० मध्ये पोलीस उपनिरीक्षक पदासाठी परीक्षा घेण्यात आली होती. या परिक्षेअंतर्गत अभिषेक इंगळे यांनी लेखी परीक्षेसह सर्व चाचण्यांमध्ये यशस्वीपणे पूर्ण केल्या. मुलाखतीतही ते सरस ठरले. त्यामुळे अभिजित इंगळे यांची शासनातर्फे पीएसआय म्हणून निवड करण्यात आली आहे. अभिजित यांच्या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ, दैनिक लक्ष महाराष्ट्र, दैनिक पथयात्री व मी महाराष्ट्र न्यूज चॅनलतर्फे अभंजित इंगळे यांचे खूप-खूप अभिनंदन व भावी वाटचालीस अगणित शुभेच्छा!

## बँकेच्या भरभराटीसाठी सदैव प्रयत्नशील रहा

### खा.गोडसे यांचे नवनिर्वाचित संचालकांना आवाहन

**नाशिक । प्रतिनिधी**



जिल्हा सहकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँकेच्या मतदारांनी तुम्हाला मतदान करून तुमच्यावर विश्वास दर्शविला आहे. जिल्हा सहकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँकेचा जिल्ह्यात नावलौकीक असून मतदारांचा विश्वास सार्थ ठरवणे तुमचे कर्तव्य आहे. सभासद तसेच जुन्या संचालक मंडळातील सदस्यांना सोबत घेवून बँकेच्या भरभराटीसाठी सदैव प्रयत्नशील रहा. असे आवाहन खा. हेमंत गोडसे यांनी जिल्हा सहकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँकेच्या नवनिर्वाचित संचालकांना केले आहे.

शासनाने जिल्हा सहकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँकेची दोन जुलै रोजी होणारी निवडणूक मतदानाच्या दोन दिवस आधी रद्द केली होती. निवडणुकीची पूर्ण तयारी झालेली असल्याने निवडणूक पुढे ढकलणे योग्य नसल्याचे खा. गोडसे यांनी सहकारमंत्री अतुल सावे यांच्या लक्षात आणून देत सदर निवडणूक ठरवल्याप्रमाणे दोन जुलै रोजीच घेण्याची आग्रही मागणी केली होती. खा.गोडसे यांची मागणी न्यायिक असल्याने निवडणूक ठरल्याप्रमाणे दोन जुलै रोजीच होण्यासाठी सहकार विभागाने ३० जून रोजी आदेश काढला होता.

जिल्हा सहकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँकेची निवडणुक दोन जुलै रोजी झाली. यात सहकार पॅनलचे सर्वच्या सर्व म्हणजे २१ उमेदवार मोठ्या मताधिक्यांनी निवडून आले आहेत. आपल्या सर्वांसाठी बँकेचे सभासद महत्वाचे आहेत. जुन्या संचालक मंडळातील सदस्यांना सोबत घेवून बँकेच्या भरभराटीसाठी सदैव प्रयत्नशील रहा अशा सूचना वजा मार्गदर्शन खा.गोडसे बँकेच्या नवनिर्वाचित संचालकांना केल्या आहेत.यावेळी नवनिर्वाचित सदस्य प्रमोद निरगुडे, रविंद्र आंधळे, बाळासाहेब ठाकरे - पाटील, विक्रम पिंगळे, अजित आव्हाड, विजय देवरे, ज्ञानेश्वर माळोदे, सुनिल गिते, मंदाकिनी पवार आदी उपस्थित होते.

## आयुष्यभर ज्यांना शिव्या दिल्या, तोच झेंडा मिरवायचा..!

युद्धात, प्रेमात आणि राजकारणात सारे काही माफ असते असे म्हणतात. याचाच आधार घेत राजकारणी मंडळी निष्ठा खुंटीला टांगून आपल्याला हवे ते करत असतात. कधीही, कोणत्याही पक्षात जातात, एकमेकांचे तोंड न पाहण्याची शपथ घेणारे त्यांच्या घरात जाऊन पाय धरण्यात मागे पुढे पाहत नाहीत. पक्ष संपविण्याची शपथ विसरून तो बळकट करण्यासाठी पायाला भिंगरी बांधतात... हे सारे होते याला कारण राजकारण. 'गद्दार नव्हे, मी तर आहे स्वाभिमानी' असा प्रचार करत आपला झेंडा नाचवतात....याला कारण काय तर अहो राजकारण. अगदी जिल्ह्यापासून राज्यात व देशातही सध्या हेच सुरू आहे.



### राजकारण ही एक बाजारपेठ होईल

**निष्ठावंतांची कदर केली पाहिजे. नेत्यांनी न्याय दिला पाहिजे. सेवेचा मोबदला म्हणून हारतुरे, मानसन्मान मिळाले पाहिजेत; अन्यथा राजकारण ही एक बाजारपेठ होईल. हे बदलणे शक्य आहे. जे प्रामाणिक आहेत, कार्यकर्ता' या व्याख्येत बसतात, समाजाची सतत काळजी वाहतात, असे लोक महापालिका सभागृहात आले पाहिजेत. भले ते फाटके असोत, कफल्लक असू देत. सच्चाईची कदर केली पाहिजे.**

कोणतीही निवडणूक आली की, पक्षबदलाची लाट येते. ही लाट असते केवळ नेत्यांच्या सोयीसाठी. जिल्ह्याचा विकास, राज्याचा विकास याबाबतचे मुद्दे फक्त पुढे केले जातात. प्रत्यक्षात मात्र प्रत्येकजण आपापली राजकीय सोय बघत असतो. स्वतः ची खुर्ची बळकट करण्यासाठी ही धडपड असते. अगदी पाच वर्षे एकमेकांना पाण्यात पाहणारे नेते आता गळ्यात गळे घालून उठवत आहेत. याला कारण काय तर राजकारणच. राजकारणाचा नाद केला, की घराची राखरांगोळी ठरलेली. सतत व्यवहारी राहिलेल्या नेत्यांचे ठीक असते; पण आयुष्य वाहून घेतलेल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचे हाल वाईट. कोणासाठी आणि कशासाठी आटापिटा करतो, हे समजेपर्यंत वय निघून जाते. कोणाची पालखी वाहतो ते समजत नाही. कोण कसा वापर करतो ते उमगत नाही. जरी कळले, तरी वेळ गेलेली असते. नंतर डोक्यावर हात मारण्याशिवाय पर्याय नसतो. असे पश्चाताप झालेले हजारो कार्यकर्ते आहेत. कोणाचा झेंडा मिरवायचा, कोणाचा प्रचार करायचा, अशा संभ्रमात दोन पिढ्यांची बरबादी झाली. सतरंज्या उचलण्यावारी घरदार आणि संसाराची राखरांगोळी केलेली ही मंडळी हाच आता चर्चेचा विषय आहे. असेच होत राहिले, तर राजकारण हे समाजसेवेचे माध्यम आहे यावरचा विश्वास उडेल. चांगले कार्यकर्ते निपजणार नाहीत. 'सत्तेची खुर्ची' त्याच्याकडून हिसकावून घेण्याच्या प्रयत्नांत संपूर्ण राजकारणाचाच विचका होऊन गेला आहे. हे कोणाच्याच लक्षात कसे येत नाही, असा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी एकत्र येऊन साधक-बाधक चर्चा करून तोडगा काढण्याची गरज आहे. नाही तर भावी काळात जनतेच्या दृष्टीने राजकीय नेते म्हणजे 'फुकट करमणुकीची' साधने बनण्याचीच शक्यता आहे.




## १६आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्यावर ठाकरे गट कोर्टात

**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसेनेच्या १६ आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्यावर विधानसभा अध्यक्षांना लवकर निर्णय देण्याची मागणी करणआरी एक याचिका शिवसेनेच्या ठाकरे गटाचे आमदार सुनील प्रभू यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी राष्ट्रवादी फोडून शिंदे- फडणवीसांची साथ देण्याचा निर्णय घेतला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निलंबनाबाबत ठाकरे गटाने पुन्हा एकदा सुप्रीम कोर्टात धाव घेतली असून या सगळ्यात आता उद्धव ठाकरे गटासोबत शरद पवार असल्याचे सांगण्यात येत आहे. ठाकरे गटाचे आमदार सुनील प्रभू यांनी केलेल्या याचिकेत म्हटले आहे की, विधानसभा अध्यक्षांना या निलंबनाबाबत निर्देश देण्यात यावेत. सुनील प्रभू यांच्या या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात लवकरच सुनावणी होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, राज्यघटनेच्या दहाव्या परिशिष्टातील तरतूद सांगते की, दोन तृतीयांशहून अधिक आमदारांचा गट फुटल्यास त्यांना दुसऱ्या पक्षात विलीन व्हावे लागते. केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह एकनाथ शिंदे यांच्या गटाला दिले. मात्र, आता सर्वोच्च न्यायालय काय करणार, हे पाहावे लागेल.

## अमेरिकेत पुन्हा वंशवाद?

अमेरिकेतील कॅलिफोर्निया, फ्लोरिडासह नऊ राज्यांनी ॲफर्मेटिव्ह ॲक्शन योजना रद्द केल्यानंतर तेथील उच्च शिक्षण संस्थांमधील कृष्णवर्णीय व अन्य वंशीय विद्यार्थ्यांच्या संख्येत घट झाली होती. आता त्याची व्याप्ती वाढेल.

अमेरिकेतील महाविद्यालये, विद्यापीठे यांनी वांशिक आधारावर प्रवेश देण्याच्या पद्धतीच्या विरोधात तेथील सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. या मुळे कृष्णवर्णीय, आशियाई आणि अन्य वांशिक अल्पसंख्य गटांना मोठा धक्का बसला आहे. हा निर्णय मुख्यत: हार्वर्ड व नॉर्थ कॅरोलिना विद्यापीठांच्या प्रवेश प्रक्रियेच्या संदर्भात असला, तरी सर्वोच्च न्यायालयाचा निकाल असल्याने अमेरिकेतील सर्व उच्च शिक्षण संस्थांनाही तो लागू होणार आहे. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी या निकालाशी असहमती व्यक्त केली आहे. तर, माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, अमेरिकेच्या दृष्टीने एक उत्तम दिवस असे म्हटले आहे. अमेरिकेतील शैक्षणिक संस्थांमध्ये वांशिक वैविध्य असावे आणि सर्व गटांना शिक्षणाची संधी मिळावी या हेतूने अमेरिकेत 'ॲफर्मेटिव्ह ॲक्शन प्रोग्रॅम'ही योजना राबवली जाते. त्यास 'स्टुडंटस फॉर फेअर ॲडमिशन' या संघटनेचा विरोध आहे. याच संघटनेने दोन विद्यापीठांच्या विरोधात खटला दाखल केला होता. कनिष्ठ न्यायालयाने तो फेटाळताना योजना योग्य असल्याचे म्हटले होती. त्या विरुद्ध संघटनेचा संस्थापक एडवर्ड ब्लम याने सर्वोच्च न्यायालयात अपील केले होते. ताज्या निर्णयामुळे वेगवेगळ्या वांशिक गटांच्या विद्यार्थ्यांना अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये प्रवेश घेणे अवघड बनेल.

अमेरिकेतील ॲफर्मेटिव्ह ॲक्शन या कल्पनेला व योजनेलाही मोठा इतिहास आहे. अमेरिकेत ६० च्या दशकाच्या सुरुवातीपर्यंत वांशिक भेदभाव जणू काही सर्वमान्य होता. शैक्षणिक संस्थेत कृष्णवर्णीयांना प्रवेश मिळत नसे. भेदाभेद संपवण्यासाठी ॲफर्मेटिव्ह ॲक्शन ही योजना शिक्षणासह सर्व क्षेत्रात राबवली जाऊ लागली. यामुळे शालेय स्तरावरील शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत आणि नोकर्यांच्या संदर्भात वर्ण व वंश यांच्या आधारावर भेद करणे जवळपास थांबले. अमेरिकेची घटनाही वंश, वर्ण यांच्या आधारे भेद करण्यास विरोध करते व समानतेची हमी देते. अमेरिकेतील मूळ निवासी(नेटिव्ह अमेरिकन्स किंवा जग ज्यांना 'रेड इंडियन' असे ओळखते) कृष्णवर्णीय यांच्या खेरीज चीन, व्हिएटनाम आदी देशांतून आलेले स्थलांतरित आशियाई, तसेच ज्यांची भाषा स्पॅनिश आहे व ज्यांना 'हिस्पॅनिक' या नावाने ओळखले जाते असे वांशिक गट प्रमुख आहेत. हिस्पॅनिक गटात मेक्सिको, कोलंबिया आदी दक्षिण अमेरिकेन देशातून आलेल्या नागरिकांचा समावेश होतो. हे गट आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास आहेत. त्यांना शिक्षणाची व नंतर रोजगाराची संधी देणे हा ॲफर्मेटिव्ह ॲक्शन या कल्पनेचा मुख्य उद्देश आहे. मात्र ही राखीव जागांसारखी संकल्पना नाही, तर केवळ त्यांच्यावर अन्याय होऊ नये असा त्या मागचा उद्देश आहे. यास 'स्टुडंटस फॉर फेअर ॲडमिशन' या संघटनेचा विरोध आहे. ही संघटना श्वेतवर्णीयांची आहे हे लक्षात घेतले पाहिजे. 'ॲफर्मेटिव्ह ॲक्शनमुळे उच्च शिक्षण संस्थांमधील गौरेतर विद्यार्थ्यांच्या संख्येत सातत्याने वाढ झाली. १९७६ पासून कृष्णवर्णीय विद्यार्थ्यांची संख्या ३३ टक्क्यांनी वाढली. अमेरिकेत अनेक भारतीय अनेक वर्षांपासून स्थायिक आहेत. या गटांना अमेरिकन ब्लॅक व अमेरिकन इंडियन असे म्हटले जाते. केवळ शिक्षणासाठी अमेरिकेत येणार्यांची संख्याही मोठी आहे. २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी अमेरिकेतील शैक्षणिक संस्थांमध्ये दोन लाखांपेक्षा जास्त भारतीय विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. निवड चाचणी, प्रत्यक्ष मुलाखती अशा प्रक्रियेतून त्यांची निवड होते. म्हणजे केवळ वंशाच्या आधारे विद्यार्थ्यास प्रवेश मिळत नाही. तरीही गुणवत्ता किंवा गुण कमी असूनही त्यांना प्रवेश दिला जातो, असा स्टुडंटस फॉर फेअर ॲडमिशनचा आरोप आहे. मुळात अमेरिकेतील उच्च शिक्षणाच्या संस्थांमधील प्रवेश प्रक्रिया अपारदर्शक असल्याचा आरोप होतो. तेथील अशा संस्थांचे चालकही तो मान्य करतात. सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय बहुमताने दिला, एकमताने नाही. या निर्णयाने उद्भवलेल्या स्थितीवर मात करण्यासाठी नवे धोरण आखण्याचे बायडेन यांनी म्हटले आहे; तरी या निर्णयाने तूर्तास अमेरिकेत वांशिक भेदभाव वाढण्याची भीती नक्कीच आहे.

## उबाठा सेनेचा मोर्चा; चोराच्या उलट्या बोंबा



मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठविण्यासाठी उबाठा सेनेने शनिवारी एका मोर्चाचे आयोजन केले होते. मोर्चाला गर्दी कमी आणि माईकवरून गर्जना जास्त, असा हा बकवास प्रकार होता. दक्षिण मुंबईत मेट्रो सिनेमापासून ते महापालिकेपर्यंत अशा छोट्या रस्त्यावर निघालेला मोर्चा असणार तरी किती? एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली गेल्या वर्षी शिवसेनेत उठाव झाल्यापासून शिंदे दिवसेंदिवस शक्तिमान होऊ लागले व ठाकरे यांचा रोज शक्तिपात सुरू झाला. पक्षप्रमुख स्वत: उसने अवसान आणून शिंदे - फडणवीसांवर रोज तेच तेच आरोप करीत आहेत. एकनाथ शिंदे यांच्या उठावानंतर पक्षाच्या बहुसंख्य आमदार-खासदारांनी शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास प्रकट केल्यापासून ठाकरे कुटुंबाची अधोगती सुरू झाली. शिवसेनाप्रमुखांची पुण्याई फार काळ वाचवू शकणार नाही हे त्यांना कळून चुकले असावे. सत्ता गेली, मुख्यमंत्रीपद गेले, सरकारही गेले. नंतर पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्हही हातातून निसटले. निवडणूक आयोगाने शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला बहाल केले. वर्षभरात एवढे प्रचंड नुकसान झाल्यावरही मुंबई आमचीच, असा आदित्य यांनी दावा करणे हास्यास्पद आहे.

वडिलांच्या सरकारमध्ये मंत्री राहिलेले आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मुंबई महापालिकेच्या भ्रष्टाचाराची चौकशी व्हावी यासाठी हा मोर्चा निघाला. या मोर्चात त्यांनी जे भाषण केले, ते त्यांच्या वयाला शोभणारे नव्हते. एकदा मंत्रीपद मिळाले म्हणजे आपण कोणी फार मोठे झालो असा त्यांचा समज झालेला दिसतो. आपल्या वडिलांचे मुख्यमंत्रीपद शिंदे यांनी हिसकावून घेतले, याचा राग त्यांना असावा. मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचाराची चौकशी व्हावी म्हणून ठाकरे यांनी मोर्चा काढावा म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा मारणे आहे. आपणच चोरी करायची आणि चोरी झाल्यानंतर त्याची चौकशी करावी, असे सांगायचे हे सर्व हास्यास्पद आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उबाठा सेनेने चुकीच्या ठिकाणी मोर्चा काढला असे म्हटले आहे. खरा मोर्चा त्यांनी मातोश्री १ व मातोश्री २ वर काढायला हवा होता, अशा शब्दांत त्यांनी शालजोडीतून हाणली आहे.

एकनाथ शिंदे हे गेली पाच दशके सार्वजनिक जीवनात काम करीत आहेत. आमदार, मंत्री आणि आता मुख्यमंत्री झाले तरी ते नेहमीच शिवसैनिक म्हणून वागत असतात. धर्मवीर आनंद दीघेंचे संस्कार आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची शिकवणूक अशा दुहेरी मुशीतून त्यांच्यातील शिवसैनिक घडला आहे. मुंबई महापालिकेच्या तिजोरीवर डल्ला मारायला ते कोणी चोर नाहीत. उलट महापालिकेला आर्थिक मदत मिळावी म्हणून त्यांनी केलेल्या कामाचा झपाटा वाखणण्यासारखा आहे. मुंबईतील रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्यावर त्यांनी भर दिला. मुंबई स्वच्छ, सुंदर, हिरवी राहावी म्हणून ते सतत नवनवीन कल्पना राबवत असतात. उलट उद्धव ठाकरे यांच्या सरकारमध्ये नगरविकास मंत्री असताना त्यांना पिता-पुत्रांनी कोणतेच अधिकार ठेवलेले नव्हते. महापालिकेतील कंत्राटे आपल्या सग्या-सोयर्‍यांना मिळावीत म्हणून पक्षप्रमुख व त्यांच्या पुत्राने काय काय केले, हेच आता चौकशीतून बाहेर येणार आहे. आदित्य यांनी मोर्चासमोर बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांना उद्देशून जी दमदाटीची भाषा वापरली ती त्यांच्या वयाला मुळीच शोभणारी नव्हती.

रस्त्याच्या कामात १२ हजार कोटींचा घोटाळा असल्याचा आरोप आदित्य करीत आहेत. खडीपासून फर्निचरपर्यंत घोटाळा झाल्याचे ते सांगत आहेत. उगीचच हातात काही कागद दाखवून आपल्याकडे पुरावे असल्याचे ते भासवत आहेत. गेली पंचवीस-तीस वर्षे मुंबई महापालिकेवर ठाकरेंच्या पक्षाची सत्ता होती. मुंबई महापालिका हाच मातोश्रीचा प्राणवायू आहे, असे उघड म्हटले जायचे. मुंबईतील रस्ते, खड्डे, पाणीपुरवठा, स्वच्छता सर्वच बाबतीत केवळ ठाकरे यांना समजते व शिंदे यांना काहीच कळत नाही, असे ठाकरे पुत्राला म्हणायचे आहे का? मातोशी १ असताना मातोश्री २ ची गरज का लागली, याचे त्यांनी या सभेत उत्तर दिले असते, तर मुंबईकर जनतेच्या ज्ञानात भर पडली असती. ठाकरे हे (अडीच वर्षे) मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास खाते होते. या खात्याचे त्यांना किती स्वातंत्र्य दिले होते, हे एकदा ठाकरे पिता-पुत्राने मुंबईकरांना सांगावे. महापालिकेतील सर्व महत्त्वाचे निर्णय मातोश्रीतून होत असत. कामाची कंत्राटे कोणा ठेकेदाराला द्यायची ते मातोश्री ठरवत असे. नोकरशहांच्या बदल्याही मातोश्रीच्या हाती होत्या. तेव्हा आपल्यावरील अन्याय एकनाथ शिंदे निमूटपणे सहन करीत होते. महापालिका हे मातोश्रीचे कुरण बनले होते. किती हजार कोटींचा भ्रष्टाचार त्यांच्या काळात झाला, किती रकमेचा गैरव्यवहार झाला, अवाच्या सव्वा किमत मोजून कोट्यवधी रुपयांची खरेदी कशी केली गेली, कोविड काळात महापालिकेच्या तिजोरीवर कसा हात मारला, हे सर्व चौकशीत बाहेर येणारच आहे. शिंदे-फडणवीस सरकारने महापालिकेच्या कारभाराची चौकशी लावली म्हणून ठाकरे पिता-पुत्राला घाम फुटला आहे. यातून सुटका करण्यासाठी त्यांनी पक्षाचा मोर्चा काढून शिंदे सरकारवर दबाव आणण्याची खेळी खेळली आहे. पण एकनाथ शिंदे हे काही लेचेपेचे राजकारणी नाहीत, मातोश्रीला उघडे पाडल्याशिवाय ते स्वस्थ बसणार नाहीत. मुंबईकरांचा पैसा ज्यांनी दोन दशके लुटण्याचे काम केले, तेच आता मुंबईला लुटू नका, असा टाहो फोडत आहेत, ही चक्क नौटंकी आहे. आता आपल्या काळ्या कृत्यांवर शिंदे - फडणवीस सरकारचा एक दिवस बुलडोझर चालणार या भीतीने मातोश्रीला ग्रासले आहे.

## उदयोन्मुख देशा भारत देशा

जागतिक घडामोडींचं विश्लेषण करणाऱ्या फॉरेन पॉलिसी या प्रसिद्ध अमेरिकी नियतकालिकात परराष्ट्र धोरणाविषयक प्रकाशित केलेल्या एका लेखात भारत हा मध्यपूर्वेतील महत्त्वाचा प्रभावशाली देश म्हणून उदयाला येत असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला गेला आहे. इतकंच नाही, तर ही संपूर्ण घडामोड ही भूराजकीय घडामोडी क्षेत्रातील गेल्या काही वर्षांतील सर्वात महत्त्वाची आणि वेधक घडामोड असल्याचे या लेखात नमूद केले आहे. लेखक स्टीव्हन ए कुक यांनी लिहिलेल्या या लेखाचा थोडक्यात आढावा.

या भौगोलिक क्षेत्रात भारताचे इस्रायल, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीसह इतर प्रमुख देशांसोबत स्थापन झालेले दृढ आणि वाढते संबंधही या लेखात अधोरेखित केले गेले आहेत. ही बाब ठळकपणे नमूद करताना त्यांना हेच सुचवायचे आहे की, या भौगोलिक क्षेत्रात भारताचे प्रभावशाली देश म्हणून उदयाला येणे म्हणजे बदलत्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे आणि या भौगोलिक क्षेत्रातल्या इतर देशांमध्ये नव्या बहुआयामी भौगोलिक ध्रुवीयतेचा लाभ घेण्याची निर्माण झालेल्या आकांक्षाचे प्रतिबिंब आहे.

दुसरीकडे या घडामोडींमध्ये हस्तक्षेप करण्याकरता अमेरिकेला फारसा वाव उरलेला नाही. उलटमार्गी या घडामोडींचा त्यांनाही फायदाच होऊ शकेल, असा दावाही या लेखाचे लेखक स्टीव्हन ए कुक यांनी आपल्या लेखात केला आहे. अमेरिकेचे मध्यपूर्व देशांमधले भागीदार देश आता अमेरिकेलाच पर्याय शोधू लागलेत आणि त्यात त्यांना भारत हा सर्वोत्तम पर्याय वाटण्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे, असे हा लेख दर्शवतो आहे.

खरे तर या भौगोलिक प्रदेशातील देशांच्या भागीदार देशांमध्ये अमेरिकेचे स्थान निर्विवादपणे सर्वात वरचे आहे. मात्र ते ही भारत जसजसा या प्रदेशात आपले अस्तित्व वाढवत जाईल, तोपर्यंतच आणि त्यानंतर ही रशिया किंवा चीनलाही आपण या क्षेत्रात महत्त्वाचे स्थान पटकावू, या भ्रमात राहता येणार नाही, असेही या लेखात अधोरेखित केले आहे. महत्त्वाची बाब अशी या लेखाच्या लेखकाने भारताला प्रत्यक्ष भेट दिली असून, त्याचा संदर्भही या लेखात मांडला आहे. साधारण दशकभरापूर्वीच्या आपल्या भारत भेटीचा संदर्भ देत त्यांनी असा दावा केला की, त्यावेळी मध्यपूर्वेच्या घडामोडींमध्ये काही एक मोठी भूमिका बजावण्याबाबत भारताला तसा काही रस असल्याचे त्यांना वाटले नव्हते. मात्र आपल्या या भेटीनंतरच्या दहा वर्षांमध्ये मात्र परिस्थिती आमूलाग्र बदलली, असे कुक यांनी प्रामुख्याने नमूद केले आहे.

अमेरिकेचे अधिकारी आणि तिथले विश्लेषक कायमच चीनच्या मध्यपूर्वेतील प्रत्येक राजनैतिक कृती आणि हालचालींवर संशयाच्या नजरेने पाहत असतात आणि त्याच आनुषंगाने चीन करत असलेल्या गुंतवणूवरही लक्ष ठेवून असतात, असे असले तरी देखील, भारत हा या प्रदेशातला एक महत्त्वाचा देश म्हणून उदयाला येत असल्याच्या, या प्रदेशातल्या सर्वात महत्त्वाच्या भूराजकीय घडामोडींकडेही अमेरिकेचे दुर्लक्ष झाले असल्याचा दावाही कुक यांनी आपल्या लेखात केला आहे. या घडामोडींचा संदर्भाने आखाती देशांचा विचार करता, संयुक्त अरब अमिराती आणि सौदी अरेबिया भारतासोबतच्या संबंध अधिक विस्तारावेत यासाठी विविध मार्गांनी जोरदार प्रयत्न करत असल्याचेही कुक यांनी आपल्या लेखात नमूद केले आहे.

खरे तर या देशांच्या धोरणांमधला हा एक महत्त्वाचा बदल असल्याचे आपण समजून घ्यायला हवे. कारण हे दोन्ही देश, विशेषत: सौदी अरेबिया अगदी दीर्घ काळापासून पाकिस्तानसोबत मैत्री राखून आहे आणि असे असतानाच इस्लामी अतिरेकाला आळा घालता यावा, या एकसमान उद्दिष्टासाठी भारतासोबतची त्यांची जवळीक वाढू लागली असली, तरी आर्थिक विकासपूर्ण घडामोडी हाच या वाढत्या संबंधांमधला मोठा दुवा आहे. हे गृहीत धरूनच या लेखात कुक यांनी या दोन्ही देशांसोबतच्या भारताच्या वाढत्या आर्थिक संबंधांवरही ठळकपणे प्रकाश टाकला आहे.

दुसरीकडे भारताच्या इस्रायलसोबतच्या दृढ संबंधांवरही या लेखात भाष्य केले गेले आहे. यात असे म्हटले आहे की, या प्रदेशातील ज्या ज्या देशांसोबत भारताचे चांगले संबंध प्रस्थापित झाले आहेत, त्यात कदाचित इस्रायलसोबतचे संबंध अधिक दृढ आहेत. या दोन्ही देशांमध्ये विविध क्षेत्रांच्या बाबतीत संबंध गेल्या काही काळात अत्यंत वेगाने वाढले, विशेषतः इस्रायलला भेट देणारे पहिले भारतीय पंतप्रधान म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१७ मध्ये इस्रायलला दिलेली भेट आणि त्यानंतर वर्षभरानंतर इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी भारताला दिलेली भेट, यानंतर दोन्ही देशांमध्ये उच्च तंत्रज्ञान व संरक्षण क्षेत्रातील संबंध अधिक दृढ झाले असल्याचे निरीक्षण या लेखात नोंदवले आहे.

कुक यांना या लेखात मांडलेल्या त्यांच्या निरीक्षणांमध्ये असे म्हटले आहे की, यापूर्वीच्या काळात, इस्रायलची छोटी बाजारपेठ आणि वादग्रस्त राजकारण (भारतातील बऱ्याच लोकांच्या बाबतीत) या कारणांमुळे याआधी भारतातील व्यापारी समुदाय इस्रायलमध्ये गुंतवणूक करण्याच्या बाबतीत फारसा उत्सूक नसायचा. पण आता ही परिस्थिती बदलू लागली आहे, असेही कुक यांनी नमूद केलं आहे.

२०२२ मध्ये अदानी समूह आणि त्यांच्या इस्रायलमधील भागीदाराने हाईफा बंदरासाठीची १.२ अब्ज डॉलर्सची निविदा आपल्या नावे केली होती. यासोबतच भारत आणि इस्रायल मुक्त व्यापार करारासाठी वाटाघाटीदेखील सुरू आहेत. अर्थात हे सगळं वास्तव असलं तरी, भारत आणि इस्रायलमधील संबंध गुंतागुंतीचे आहेत. पॅलेस्टाइनला दर्शवलेल्या पाठिंब्यावरही भारत ठाम आहे, भारताचे इराणसोबतही मैत्रीपूर्ण संबंध आहेत, इराणकडून भारताने मोठ्या प्रमाणात तेल खरेदीही केली आहे आणि या सगळ्या पार्श्वभूमीवर भारतातील अनेक उच्चप्रतिष्ठीत लोक, इस्रायलकडे आपल्या देशाच्या वसाहतवादी अनुभवाच्या चष्म्यातूनच पाहात असल्याचे मतही कुक यांनी आपल्या लेखात व्यक्त केले आहे.


या सगळ्यासोबतच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतीच इजिप्तला दिलेल्या दोन दिवसांच्या भेटीचा संदर्भही कुक यांनी आपल्या लेखात मांडला आहे. पंतप्रधानांची ही भेट म्हणजे भारत आणि इजिप्तमधला स्नेह सोहळाच असल्याचे कुक यांनी म्हटले आहे. इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अब्देल फतह अल - सिसी भारताच्या ७४व्या प्रजासत्ताक दिनाच्या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले होते आणि त्यानंतर आता सुमारे सहा महिन्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इजिप्तला दिलेली भेट हा याच स्नेह सोहळ्याचा भाग असल्याचे मत कुक यांनी व्यक्त केलंय.

चीनसह भारतातील नागरिक आणि व्यापारीही, इजिप्त म्हणजे आफ्रिका आणि युरोपात आपला वस्तुमाल पाठवण्यासाठीचा प्रवेशमार्ग असल्याचं मानतात, असं महत्त्वाचं निरीक्षणही कुक यांनी आपल्या लेखात व्यक्त केलं आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर या भौगोलिक प्रदेशातील भारताच्या वाढत्या भूमिका आणि महत्त्वाकडे अमेरिकेच्या धोरणकर्त्यांना आणि विश्लेषक चीनसोबतच्या महासत्तेच्या स्पर्धेच्या चष्म्यातून आकर्षित झाल्यासारखे पाहात आहेत, असंही कुक यांनी आपल्या लेखात म्हटलंय. त्यादृष्टीने पाहिले, तर चीनला प्रत्युत्तर देताना त्यांच्यासमोर अतिरिक्त स्पर्धक उभा राहणे हे अमेरिकेच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारेच आहे, कारण बायडेन यांचे प्रशासन या प्रदेशातील घडामोडींना फारसे महत्त्व देत नसून, ते या सगळ्याकडे चीनला रोखण्याची संधी म्हणूनच पाहात असल्याचा दावा कुक यांनी आपल्या लेखातून केला आहे. म्हणूनच जून महिन्याच्या अखेरीस पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अमेरिका भेटदेखील, अमेरिकी संसदेच्या संयुक्त अधिवेशनाला संबोधित करण्यासारख्या आणि स्टेट डिनर या गौरवपूर्ण घटकांचा समावेश असलेला भारत आणि अमेरिकेतला स्नेह सोहळाच होता, असंही कुक यांनी म्हटलं आहे.

अमेरिका आणि भारताच्या संबंधांच्या दृष्टीने असं सगळं सकारात्मक वातावरण दिसत असलं तरी, भारताला अमेरिकेच्या कल्पनेनुसार त्यांचा धोरणात्मक भागीदार व्हायचे नसावे, असा दावाही कुक यांनी आपल्या लेखातून केला आहे. मध्यपूर्वेचा विचार केला, तर इराणच्या बाबतीत भारताचा दृष्टिकोन हा अमेरिका आणि इस्रायलपेक्षा वेगळा आहे. हे लक्षात घेऊनच अमेरिकेने मध्यपूर्वेतील भारताच्या आर्थिक आणि सुरक्षा संबंधांच्या विस्तारांचा काय काय अर्थ असू शकतो, त्याबाबतच्या आपल्या अपेक्षांवर नियंत्रण ठेवायला हवे, असा सल्लाही कुक यांनी या लेखातून दिला आहे.

भारत अमेरिकेशी पूर्णतः जुळवून घेईल, अशी शक्यता नाही, पण त्याच वेळी चीन आणि रशिया या दोन्ही देशांनी अमेरिकेला ज्याप्रमाणे कमी लेखणे सुरू केले आहे, तसा भारत वागणार नाही, असा विश्वासही कुक यांच्या या लेखातून व्यक्त झाला आहे. महत्त्वाचं म्हणजे आपल्या लेखाचा समारोप करताना कुक यांनी या भौगोलिक प्रदेशातील भारताच्या सामर्थ्याला गांभीर्याने घेण्याची वेळ आली असल्याचा इशारा सर्वच संबंधितांना दिला आहे.

## शब्दकोडे-११२



आडवे शब्द

१. सट्टा ४. कुणाकडे हा धनाचा असतो तर कुणाकडे गुणांचा! ६. राक्षस ७. नवविवाहितांचा श्रावणसण १०. चटकन, त्वरित १२. पक्ष, कड १३. साजण १४. जीत १५. वर्ण, रंग १७. विठ्ठलपत्नी १८. बोटाइतके, छोटा तुकडा २०. मजकुराच्या प्रती बनवणारा २२. हिरकणीमुळे प्रसिद्धीस आलेला रायगडावरील कडा २४. वार्ताहर २६. शाळेत यातून 'वाटावाटी' करतात २८. धोबी ३०. जमिनीखाली येणारे 'खोड' ३१. उत्सव ३२. संपणे ३४. निवाड्याचे ठिकाण ३६. सरावाने निष्णात ३८. वांगयाचा झणझणीत पदार्थ ४०. दुनिया ४२. नेहमी तय्यार! ४३. नृत्यकलेचे दैवत ४६. दंगामस्ती, मौज ४७. देह, शरीर ४९. ताणल्यास तुटणारे ५१. दोनवेळा म्हटल्यास फारच बडबड! ५३. थरथर ५५. अतर्क्य घटना ५७. धोकादायक (हिंदी) ५९. जेव्हा (संस्कृत) ६१. नट पिळण्याचे साधन ६२. घनघोर युद्ध ६३. डाळीचे कालवण ६४. प्राण्यांचे शस्त्र ६६. वन्य, रानटी ६९. आजीची आजी ७३. कडक व चिवट ७४. धनी ७६. वागणूक ७७. कथेचा गोषवारा ७८. गीत ७९. वाटप ८०. माकडीण ८१. राजकीय आखाड्यात कांदेपोह्याशी टक्कर घेणारा पदार्थ

उभे शब्द

२. तीट ३. आवाज ४. कोळशाची पूड ५. अपात्र ६. नशीबवान ७. कबूल, संमत ८. भाद्रपदात माहेरी येणाऱ्या ज्येष्ठा-कनिष्ठा ९. चेहऱ्यावरील तेज ११. मान ठेवणे, आदर करणे १४. जनक राजाची मुलगी, सीता १६. नूतन १७अ. 'आला --- समिंदर, त्याला नाही धीर' (ज्योत्सना भोळे यांचे गाजलेले गीत) १८. बकरा १९. पूजाअर्चा सांगणारा ब्राह्मण २०अ. स्थूल २१. या दोन वेळा चुकवू नयेत अशी जगरहाटी आहे २३. मला २४. दूरचा नातेसंबंध २५. सेवक २७. श्रीकृष्णाचे वाद्य २९. लेंगा ३०. श्रीकृष्णाचा मामा ३३. रत्न (हिंदी) ३५. वाहन ३७. बोबडी वळणे ३८. रमताराम ३९. चांदणी ४१. शिडाचे जहाज ४४. ताणलेल्या दोरीचा अवाज ४५. सोन्याचा धागा ४६. पकड! ४८. विनंती, मागणी ५०. अधिकउणे ताकद (हिंदी) ५२. करा घेऊन मिरवणारी ५३. बांगडी, कडे ५४. डोळा ५६. उन्हाची तीव्रता ५८. तमाशातील रूपवती ६०. येऊन पोहोचणे ६१. दूर गेलेला, वंचित ६५. भयानक, भयंकर ६६. पोटातील कृमी ६७. किल्लेदार ६८. नाहकच 'एकाक्ष' म्हणून ओळखला जाणारा पक्षी ७०. डोंगर ७१. वाचन, पारायण ७२. आयुष्य ७३. चणचण ७४. माणूस ७५. सततची मागणी, हट्ट ७८. खेडे, वस्ती

### शब्दकोडे १११ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.रजत ४.वसंत शिशिर ८.ताक १०.पोक ११.क्षमावंत १३.समोरासमोर १५.गळचेपी १६.कामदार १९.कणखर २०.वतनदार २३.खळखळाट २६.फार २७.रस २८.पटपट ३०.कालहरण ३१.सामना ३२.टोपली ३४.लीनता ३६.वायदा ३७.पण ३९.रयत ४२.तपास ४४.रवा ४६.जीवन ४९.क्षमा ५०.चरस ५३.सटीसामाशी ५६.शानदार ५९.मदन ६१.तरू ६२.जन ६३.मालदार ६५.समा ६६.द्विशतक ६८.नरवीर ७०.माती ७१.बरकत ७३.रणबावरा ७५.नर ७७.यमक ७९.डम ८०.गार ८२.पावा ८४.अवास्तव ८६.अवाच्या सवा ८९.खोटारडा ९०.मस्त ९१.कडबू ९२.वहिनी

**उभे उत्तर**

१.रक्षक २.जमा ३.तवंग ५.संतापी ६.शिरकाण ७.रसदार ८.तारा ९.कसरत १०.पोर १२.तळतळाट १४.मोर १७.मखमल १८.ओळ १९.कर्ण २०.वरण २१.दारमदार २२.रसना २३.खटाटोप २४.खपली २५.टपली २६.फारकत २९.टन ३१.साय ३३.पणजी ३५.तार ३६.वासर ३८.रानटी ४०.यक्ष ४१.तमाशा ४३.पाचर ४५.वार्ताहर ४७.वसन ४८.लामा ५१.सकल ५२.समसमान ५४.सारांश ५५.शीतकर ५७.नजर ५८.दानवीर ६०.दमा ६४.दादरा ६६.द्वितीय ६७.तबक ६८.नतमस्तक ६९.रणगाजी ७२.कडवा ७४.बारव ७६.रपाटा ७८.मरू ८१.भवानी ८३.वार ८४.अस्त ८५.वड ८७.च्याव ८८.सही

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## भवरलाल जैन अनंतात विलिन



**होळनांथे ।** धूळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे, ग्रामीण जिल्हा उपाध्यक्ष तथा भारतीय जैन संघटनेचे जिल्हा प्रसिध्दप्रमुख राजकुमार जैन यांचे पिताश्री स्वर्गीय भवरलालजी गंगाराम जैन ( वय८५) यांचे दिनांक ०४ जुलै मंगळवार रोजी सकाळी ठीक १०:३० वाजेला वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले. त्यांची अंतिम यात्रा सायंकाळी चार वाजता बभळाज येथे संपन्न झाली. त्यांच्या दोन भाऊ, वहिनी, दोन बहिणी, एक मुलगा, सुन, नातू , सहा मुली, जावाई व नातवंड असा परिवार आहे.

# संदीप तंत्रनिकेतन महाविद्यालयाची उज्वल निकालाची परंपरा कायम; प्रांजल हरल प्रथम

**नाशिक । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे उन्हाळी- २०२३ पदविका परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. या निकालांमध्ये संदीपतंत्रनिकेतन महाविद्यालयातील विदयार्थ्यांनी भरघोस यश मिळवून उज्वल निकालांची परंपरा कायम ठेवली आहे. तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकीची विद्यार्थिनी प्रांजल हरल ८९:३०% गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम आली आहे.



महाविद्यालयाचा तृतीय वर्षाचा निकाल ८६% लागला असून तब्बल ८०% विद्यार्थी विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झाले आहेत. शाखानिहाय गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे तेजस्विनी चव्हाण (स्थापत्य (७८.८९%), मानसी देवरे (विद्युत ८३.२२%) मोहित गवांदे (यंत्र, ८६,३%) यश जेजुरकर (८६.८२% माहिती तंत्रज्ञान). याबरोबरच पुढील विद्यार्थ्यांनी विषयवार गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे. ध्रुव दत्ता (फ्लुइड मेकॅनिक्स ९९/१००) मृणमयी कुंभार (गणित ९९/१००), संपदा कुलकर्णी (गणित ९९/१००), सिद्धी पाटील (पीएचपी प्रोग्रॅमिंग ९७/१००), वैभवी कपिले (पीएचपी प्रोग्रॅमिंग ९६/१००) मानस पाटील (जावा ९६/१००) या विदयार्थ्यांनी देदिप्यमान यश प्राप्त केले आहे. करोना नंतरच्या काळात विदयार्थ्यांनी लेखी परीक्षेत यश मिळवावे यासाठी महाविद्यालयाने लेखी पूर्व सराव परीक्षा, ज्यादा तासिका घेवून मेहनत करून घेतली होती. यामुळे विद्यार्थ्यांना यश मिळणे सहजसाध्य झाले आहे असे अध्यक्ष डॉ संदीप झा यांनी सांगितले. . तृतीय वर्ष उत्तीर्ण झालेल्या ब-याच विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्यू मध्ये या आधीच निवड झाली आहे या विद्यार्थ्यांसमोर नोकरी तसेच उच्च शिक्षण असे दोन्ही पर्याय उपलब्ध असल्याचेही डॉ संदीप झा यांनी नमूद केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अध्यक्ष डॉ. संदीप झा, विशेष अधिकारी प्रा. प्रमोद करोले प्राचार्य पंकज धर्माधिकारी तसेच सर्व विभाग प्रमुखांनी अभिनंदन केले आहे.

# अंबड औद्योगिक वसाहतीत धडक स्वच्छता मोहीम

## परिसर रोगराईमुक्त करण्यास आयमा कटिबद्ध– पांचाळ

**नाशिक । प्रतिनिधी**

अंबड औद्योगिक वसाहत परिसर कचरा व रोगराईमुक्त करण्यासाठी आयमाच्या पुढाकाराने तसेच एमआयडीसी, महापालिका व गोदावरी संवर्धन समितीच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी दिवसभर स्वछता मोहीम राबवून मोठ्या प्रमाणात कचरा संकलित करण्यात आला.



या मोहिमेत आयमाचे अध्यक्ष निखिल पांचाळ, निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, आयमाचे उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे, सुदर्शन डोंगरे, सचिव गोविन्द झा, पर्यावरण समितीचे प्रकाश ब्राह्मणकर, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी, कार्यकारी अभियंता जे.सी.बोरसे, उपअभियंता नितीन पाटील, जे. पी. पवार, एस. एस. पाटील, क्षेत्रीय व्यवस्थापक बी. डी. शेवाळे, उपरचनाकार विजय जोशी, गोदावरी नदी संवर्धन समितीचे निशिकांत पगारे, योगेश बर्वे, अजय कापडणीस, मनपा विभागीय अधिकारी डॉ. मयूर पाटील, विभागीय स्वच्छता निरीक्षक संजय गांगुर्डे, सहाय्यक अभियंता हेमंत भोसले, स्वच्छता निरीक्षक रावसाहेब मते, राजाराम गायकर, जितू परमार, विजय जाधव, राजू जाधव, रोहित पाटील, संग्राम साळवे आदी सहभागी झाले होते. स्वछता मोहिमेत ८ घंटागाड्या, ३ जेसीबी आणि १०० हून अधिक स्वछता कर्मचारी सहभागी झाले. लोकांनाही आपला परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन या उपक्रमद्वारे करण्यात येत होते.

याप्रसंगी एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी यांनी आयमा व औद्योगिक संघटना पर्यावरण संवर्धनासाठी राबवित असलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. कार्यकारी अभियंता जे. सी. बोरसे यांनीही स्वच्छतेबाबत लोकांमध्ये जागृती करण्याचे आवाहन केले. आयमाचे अध्यक्ष निखिल पांचाळ यांनी प्रास्ताविक केले. पर्यावरण समितीचा चेअरमन असताना क्लीन अंबड-ग्रीन अंबड ही संकल्पना राबविली त्याचे आज मोठ्या प्रमाणात फलित दिसत आहे. ब्लॅक स्पॉटची संख्या शंभर वरून तीसवर आली आणि येत्या काही दिवसात शून्यावर आणण्याचा आमचा मानस असल्याचा विश्वास पांचाळ यांनी व्यक्त केला. गोदावरी नदी संवर्धन समितीचे निशिकांत पगारे यांनी सांगितले की, उच्च न्यायालय आदेशित समितीच्या माध्यमातून जनजागृती व प्रबोधन केले जात आहे. त्याचाच भाग म्हणून पर्यावरण संदर्भात चांगले काम करणाऱ्या औद्योगिक उद्योगाचा सन्मान केला पाहिजे. यापूर्वी अशा उद्योगांचा सन्मान विभागीय आयुक्त यांच्या हस्ते सन्मान आला होता. अंबड औद्योगिक वसाहतीतील सर्व विभागात हे स्वच्छता अभियान राबविले जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. अंबड औद्योगिक परिसरात घंटागाड्यांची संख्या वाढल्याने दैनंदिन कचरा उचलला जातो ही बाब स्तुत्य आहे. पावसाळ्याचे दिवस लक्षात घेऊन महापालिकेने हा परिसर स्वच्छ व रोगराईमुक्त राहील यादृष्टीने अधिक काळजी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

पर्यावरण रक्षणासाठी उद्योजकही मोठ्या प्रमाणात सहकार्य करतात. तरीही कुठे खट्ट वाजले की उद्योजकांना स्वच्छतेबाबत आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे थांबविले पाहिजे. कचऱ्याचे संकलन झाले नाही तर उद्योजक स्वतः त्याची विल्हेवाट लावतो व औद्योगिक परिसर स्वच्छ ठेवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो. पर्यावरण रक्षणासाठी प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या उद्योजकांच्या या कामांची दखल घेतली जात नाही याबद्दल खेद वाटतो असे निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे यांनी आपल्या भाषणात सांगितले.स्वछता मोहिमेत ८ घंटागाड्या, ३ जेसीबी आणि १०० हून अधिक स्वछता कर्मचारी सहभागी झाले. लोकांनाही आपला परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन या उपक्रमद्वारे करण्यात येत होते.

आयमा मूलभूत सेवा समितीचे चेअरमन हेमंत खोंड, दिलीप वाघ, हर्षद बेळे, देवेंद्र विभुते, कुंदन डरंगे आदी यावेळी उपस्थित होते. आयमा उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे यांनी आभार मानले.

# गुरुबद्दल कृतज्ञताभाव व्यक्त करण्याचा दिवस

**कैलास महाराज घुगे**

**नाशिक । प्रतिनिधी**

आपण कोणाचं तरी शिष्य असावं, कोणीतरी नोकर मालक, पत्नी पती, सुन सासु, भक्त देव अशा जोड्या असतातच तशा व्यास नारद, वशिष्ट राम, कृष्ण सांदिपनी, अर्जुन कृष्ण, ज्ञानेश्वर निवृत्ती, नामदेव विसोबा, निळोबा तुकोबा, एकनाथ जनार्दन या शिष्य गुरुच्या जोड्या प्रसिद्ध आहेत. शिष्याने गुरुच्या प्रती कृतज्ञता भाव व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा आहे असे विचार हभपश्री कैलास महाराज घुगे यांनी संभाजी नगर येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिरात व्यक्त केले. ते वारकरी महामंडळ नाशिक



अध्यक्ष हभपश्री आण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर यांचे गुरुपुजन प्रसंगी आयोजित केलेल्या किर्तनात बोलत होते.

नाशिक पच्छिमच्या आमदार सौ.सिमाताई महेश हिरे यांनीही कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या यावेळी मा.नगरसेवक नंदुशेठ जाधव, अशोकनगर सप्तश्रृंगी जेष्ट नागरिक संघाचे अध्यक्ष हभपश्री किसनराव पा.खताळे, शिवसेना नेते हभपश्री शांताराम बुवा चव्हाण, वास्तुविशारद हभपश्री विजय बुरकुल,यांनीही गुरुंचे महत्त्व प्रतिपादन केले. यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वारकरी महामंडळ युवा समिती नाशिक शहराध्यक्ष हभपश्री धनंजय महाराज रहाणे यांनी केले. अन्नदानसेवा पुजा पेट्रोलियम चे संचालक श्री गोकुळ निगळ व नगरसेविका सौ.सिमाताई निगळ यांनी केले. तर मोलाचे सहकार्य जनविकास फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री बाळासाहेब जाधव, जिलेबीवाले सुनिल बडगुजर अशोकनगर, दक्षिणमुखी हनुमान मंदिर समिती संभाजीनगर यांनी केले.

यावेळी वारकरी महामंडळ नाशिक जिल्हा संपर्कप्रमुख हभपश्री साहेबराव महाराज अनवट कालवीकर,पत्रकार हभपश्री रोशन निफाडे विंचुरी, सातपूर भाजपाचे नेते श्री भगवान रायते,शिवसेना नेते श्री दिपकजी मौले श्री.अरुणजी भोसले, पिंपळगांव चे हभपश्री छबुनाना नागरे, हभपश्री गणेश काकड,बेजगावचे हभपश्री रमन वायभासे, हभपश्री काळु सानप, वासाळीचे हभपश्री शिवराम भावले, हभप सुनिता शेळके, हभपसौ ताराबाई खोडे, हभपसौ ज्योत्स्ना ताई पांचाळ, वारकरी भजनी महिला मंडळाच्या अध्यक्षा हभप सौ सुमनताई शिंदे, व वारकरी भाविक शिष्य परिवार महिला व पुरुष उपस्थित होते.

# सद्गुरु श्री शंकर महाराज मुर्ती स्थापना सोहळा उत्साहात

**नाशिक । प्रतिनिधी**

सोमवार रोजी गुरुपौर्णिमा व सद्गुरू श्री शंकर महाराजांची मूर्ती स्थापना सोहळा श्री शंकर महाराज मठ वावरे कॉलेज समोर दराडे हॉस्पीटलच्या मागे संपन्न झाला.

श्री शंकर महाराज मठ हा १९९६ पासून श्री महाराजांच्या वशंजापैकी अंतापुरचे परंतु नाशिक येथे वास्तव्यास असलेले श्री संजय हिरे महाराजांनी हा मठ उत्तमनगर नाशिक येथे स्थापन केलेला आहे. या मठामध्ये महाराजांची फोटोची आजपर्यंत पुजा होत होती. परंतु गुरुपौर्णिमा निमित्ताने सद्गुरू श्री शंकर महाराजांचे मुर्ती रूपात या मठात आगमन झाले. सर्व मठ आकर्षक अशा फुलांनी सजविण्यात आला होता. सकाळी मठात महापुजा करण्यात आली. श्री शंकर महाराज बालपणी ज्या शिवलिंगाबरोबर खेळायचे त्या शिवलिंगाचा अभिषेक व पुजा करण्यात आली. श्री शंकर महाराजांच्या मुर्तीची सकाळी १० वाजता भव्य मिरवणूक काढण्यात आली. सर्व उत्तमनगर परिसर शंकरमय झाला होता. दुपारी १ वाजता मुर्ती स्थापना सोहळा संपन्न झाला. मुर्ती स्थापनेसाठी सर्व पवित्र नद्यांच्या पाण्याने अभिषेक करण्यात आला.

# लासलगाव रेल्वे स्थानकावर सुट्ट्या पैशांसाठी प्रवाशांची अडवणूक

**लासलगाव । वार्ताहर**

लासलगाव रेल्वे स्थानकावर दररोज पंचवटीच्या वेळी अनेक प्रवाशांनी सुट्टे पैसे द्यावे या मागणीसाठी बुकिंग ऑफिस कडून अडवणूक केली जात आहे.सकाळी ६ वाजेची वेळ असल्याने सुट्टे आणायचे कुठे कुठून ? असा प्रश्न प्रवाशी विचारत आहेत,मात्र तरीही तिकीट देणारे अधिकारी आपल्या भूमिकेवर अडून राहत असल्याने प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

लासलगाव रेल्वे स्थानकावरून मुंबईकडे जाण्यासाठी सकाळी ६.२० वाजता पंचवटी एक्सप्रेस आहे.


**ॲड.सीमा एल पाटील, धुळे**
**निशाणी नं.६**

### जाहिर नोटीस

**धुळे येथिल मे.सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) सो. यांचे कोर्टात**

**दि.कि. अर्ज नं ६६४/२०२३**

वैशाली भगवान पाटील ........**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ... **सामनेवाला**

(कै. भगवान भटा पाटील - मयत) वगैरे .....**जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे न्यायालयात दि. १३/०६/२०२३ रोजी दि. कि. अर्ज नं. ६६४/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. भगवान भटा पाटील, कै. विमलबाई भगवान पाटील, कै. रविंद्र भगवान पाटील यांचा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि. १०/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर कोर्ट नं. १ यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण-धुळे
दिनांक :- ३०/०६/२०२३

आदेशावरुन

(शिक्का)

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**
**अधिक्षक** — **दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**



**ॲड. ज्योत्स्ना पाटील, धुळे**
**निशाणी नं.६**

### जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. धुळे यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७९८/२०२३**

कमला सुरेंद्र पाटील वगैरे ........**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ... **सामनेवाला**

कै. सुरेंद्र पांडुरंग पाटील
मयताचा पत्ताः- श्रध्दा हॉस्पिटल ता. जि. धुळे
दि. १६/०२/२०२० ........**मयत**

ज्याआर्थी अर्जदार नं १ ते ३ यांनी कै. सुरेंद्र पांडुरंग पाटील यांचे कायदेशीर वारस आहे. असा वारस दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथील मे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं ५ यांचे कोर्टात

दि.१९/०८/२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता मे. कोर्टात स्वतः किंवा वकिलामार्फत /प्रतिनिधीमार्फत हजर राहून सदरकामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे.न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवून वरील अर्जात नं १ ते ३ यांना कै. सुरेंद्र पांडुरंग पाटील यांचे कायदेशीर वारस म्हणून बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कुणाचीही काहीही हरकत ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहिर नोटीस कोर्टाच्या सही/शिक्यानिशी आज दि.०३/०७/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ०३/०७/२०२३

आदेशावरुन

(शिक्का)

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,, धुळे**
**अधिक्षक** — **दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, धुळे**



**ॲड.देवराम डी. बागुल, धुळे**
**निशाणी नं.६**

### जाहिर नोटीस

**धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो व. स्तर यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज. क्र.७३६/२०२३**

१. विमलबाई भिका शिरसाठ उ.वय.:- ७८वर्ष, धंदा:-घरकाम
२. जगदिश भिका शिरसाठ उ.वय.:- ४७ वर्ष, धंदा :- मजुरी
नं. १ ते ३ रा. मु. चौगाव, पो. गोताणे, ता. जि. धुळे.
३. देवकाबाई भगवान कोळी उ.वय :- ४६ वर्ष, धंदा :- घरकाम
रा.तामसवाडी, ता. पारोळा, जि. जळगाव. ........**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** ... **सामनेवाला**

**आणि**

कै. माणिक भावजी कोळी (शिरसाठ) (मयत)
मृत्यु दिनांक १९/०१/१९८४,
मृत्यु ठिकाण चौगाव, ता. जि. धुळे. ........**मयत**

ज्याआर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात दि. २२/०६/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं.७७६/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी कै. माणिक भावजी कोळी (शिरसाठ) (मयत) यांच्या नावे मौजे चौगाव, ता. जि. धुळे येथील सिटी सर्व्हे नं. २५४, एकुण क्षेत्र ६३ चौ. मी. बांधीव घर (४४ X १६ चौ. फु.) या हिश्यास अर्जदार नं. १ ते ३ हे कायदेशीर वारस असल्याने त्यांना नाव लावणेसाठी तसा कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.०५/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठ स्तर कोर्ट नं. ४, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस सकाळी ठिक १०:०० वाजता उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थ मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही. तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणा-या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :-०१/०७/२०२३

आदेशावरुन

(शिक्का)

**कामगिरी कारकुन** — **मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**
**अधिक्षक** — **मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**



**ॲड.प्रतिभा आर. मोरे**
**निशाणी नं.६**

### जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. सह दिवाणी न्याया. सो (व.स्तर) यांचे कोर्टात**

**दि. कि. अर्ज. क्र.७६२/२०२३**

१) श्री. देवसिंग लोटन पवार उ.व-५२ धंदा :-मजुरी
रा. गोविंद कानळ चाळ, जिमखाना रोड सांगर्ली डोंबिवली (पूर्व) कल्याण, ठाणे, डोंबिवली महाराष्ट्र पिनं ४२१२०३
२) श्री. विलास लोटन राजपुत उ.व-४४ धंदा :- शेती व व्यापार
रा.प्लॉट नं ३, भावसार कॉलनी, जमनागिरी रोड, धान्य गोडाउन जवळ, ता.जि.धुळे
३) श्री वजेसिंग लोटन पाटील उ.व-३२ धंदा:- व्यापार
रा. वेल्हाणे सर्व्हे नं १९८, ता जि धुळे
४) सौ सिमा सोमशिगं दोडे उ.व ३४ धंदा:-घरकाम
रा. पिंप्री औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद पिन ४३११५० ...**अर्जदार**

**विरुध्द**

कै.गंगुबाई महारू पाटील (फार पुर्वी मयत) आई
कै.पांडुरंग महारू पाटील (मयत १४/०४/२०२१) चे वारस तसेच
कै. आशाबाई पांडुरंग पाटील (मयत १५/०४/२०२१)- चे वारस
कै. लोटन महारू पाटील (पांडुरंगचा भाउ)
(मयत २७/०९/२०२१) पांडुरंग भाउ चे वारस
वरील अर्जदारांव्यतरिक्त इतर कोणीही नाही) ........**सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांचे सख्खे काका व काकु मयत असल्याने, त्यांचे वारस म्हणुन नाव लावणे कामी अर्ज हा अर्ज हिंदु वारस कायदा १९५६ चे कलम ३७२ अन्वये वारस दाखला मिळणे कामी अर्ज, हा त्यांचे ताबेउपभोगीतल, मौजे धुळे ता.धुळे जि.धुळे I) कै आशाबाई पांडुरंग पाटील व कै पांडुरंग महारू महारू पाटील दोघांच्या नावाने जॉइंट खाते होते त्याची माहिती खालील प्रमाण की,

१) जीपी पारसिक बॅंक चे खाते क ००८८०१०१०००२८६७ मध्ये असलेली पासबुक प्रमाणे शिक्कल रक्कम रूपये १,४८,८६८ रूपये ५६ पैसे आहेत व असल्यास, मुदत ठेवी.

२) सेंट्रल बॅंक ऑफ इडिंया मधील

**अ.** खाते नंबर ३५२२६७०८५६ मध्ये असलेली पासबुक प्रमाणे शिक्कल रक्कम रूपये ७९,६९६ रूपये ३० पैसे आहेत

**ब.** मुदत ठेव पावती क ०१५३९४२ रक्कम २ लाख मात्र रक्कमेची आहे.

**क.** मुदत ठेव पावती क ०१५३८७४ रक्कम ५ लाख मात्र रक्कमेची आहे.

३) पोस्ट खाते क ४६३४८२०८६७ पुस्तक १२०३१ / - शिल्लक रक्कम रूपये. तसेच

II) कै पांडुरंग महारू पाटील नावाने खाते होते त्याची माहिती खालील प्रमाणे की,

२) पंजाब नॅशनल बॅंक गल्ली नं ४ शाखा खाते नं ०१३९०००१०९२९६३०९ असुन, मध्ये असलेली पासबुक प्रमाणे शिक्कल रक्कम रूपये २,१३१ /- आहेत व असल्यास, मुदत ठेवी.

तसेच एल आय सी पॉलीसी नं ९२३९८५२५२ मधील असलेली रक्कम विमा राशी सुमारे १३,००,९५८/- मात्रची रक्कम

पोस्ट खाते क ४९०१२०२७९० पुस्तक

पोस्ट खाते क ४९८२१६४७८१ पुस्तक

III) कै आशाबाई पांडुरंग पाटीलयांचे नावाने खालील मिळकती

**मिळकती अ :-** मौजे धुळे ता. जि. धुळे, महानगर पालीका हददीतील मालमत्ता, भूमापन क्रमांक ५७६/५ पैकी प्लॉट नं ८ / ब चे क्षेत्र ४४००.० चौ फुट अर्थात ४०० चौ. मी. मिळकतीचा ७/१२ उतारा, असुन त्याचे मुल्यांनक दाखल केलेले आहे. त्यासी सिटी सर्व्हे नंबर ५४७४ असा आहे.

वर नमुद मिळकतीच्या उतारा - यावर मयतानंतर, तिनही पुतणे व १ पुतणी या सर्व अर्जदार यांचे नाव हे लावायाचे आहे. त्या बाबत दाखल केला आहे.

सदर प्रकरणात पुढिल तारीख ही १०/०८/२०२३ अशी धुळे येथिल मे. (दिवाणी न्यायाधिश सो ( क.स्तर) हयांचे कोटीत कोर्ट नंबर यांचे समक्ष नेमण्यात आलेली आहे. सदर अर्जा बाबत कोणाचाही कोणताही हरकत असल्यास त्यांनी त्यांचे म्हणणे घेवुन वरील न्यायालयात सकाळी १०:३० वाजता त्यांचे म्हणणे मांडणे कामी हजर रहावे व म्हणणे मांडावे.

वरील दिवशी व वेळेस कोणीही हजर न झाल्यास, अर्जात कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येवुन, अर्जात अर्जदार हयांचे लाभात एकतर्फी निकाल हा करण्यात येइल.

येण प्रमाणे जाहिर नोटीस असे.

धुळे
दिनांक - ३०/०६/२०२३

(शिक्का)

**व.लि** — **मे.दिवाणी न्यायाधिश सो व.स्तर**
**अधिक्षक** — **मे.दिवाणी न्यायाधिश सो व.स्तर**

लक्ष महाराष्ट्र

बुधवार, दि. ५ जुलै २०२३



## न्यूज कॉलम

### वालखेड्यात सिकलसेल निर्मुलन अभियानाचा शुभारंभ

**सोनगीर ।** वरवाडे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय सिकलसेल ऍनिमिया निर्मूलन अभियान कार्यक्रमाचा शुभारंभ केला. त्या अनुषंगाने प्राथमिक आरोग्य केंद्र वालखेडा ता.शिंदखेडा येथे सदर कार्यक्रमाचा शुभारंभ प्रमुख अतिथी जि.प. सदस्य पंकज कदम, पंचायत समिती सदस्य प्रवीण मोरे यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना कार्ड वाटप करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.तेजल वानखेडे मॅडम यांनी उपस्थित लाभार्थ्यांना सिकलसेल विषयी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.योगेश पाटील, आरोग्य सहायिका लता महाजन, आरोग्य सेवक सुयोग पिंगळे इ.,उपस्थित होते.

### मांस विक्रीप्रकरणी दोघांवर गुन्हा

**धुळे ।** शहरातील अविष्कार कॉलनीतील बंद घराच्या कंपाउंडमध्ये विनापरवानगी मांस विक्री करताना दोन संशयित आढळले. ही कारवाई एक जुलैला दहाच्या सुमारास झाली. चाळीसगाव रोड पोलिसांनी छापा टाकून जावेद लुकमान खाटीक व सद्दाम मोहम्मद युसूफ खाटीक यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला.


# नाशिकमध्ये कार्यालय ताब्यात घेण्यावरुन दोन्ही गट आमने-सामने

### जोरदार घोषणाबाजी

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक मधून मोठी बातमी समोर येत आहे. अजित पवार गटाकडून नाशिक मधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयाचा ताब्या घेण्यात आला आहे. त्यामुळे नाशिक मधील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात कोणालाही घुसू देणार नाही अशी भूमिका अजित पवार गटाचे समर्थक आणि राष्ट्रवादीचे सरचिटणीस दीलीप खैरे आणि युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अंबादास खैरे यांनी घेतली आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या नाशिक येथील कार्यालयाबाहेर मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.





**आम्ही अजित पवारांसोबत**

**राजकारणात होत असलेल्या घडामोडींमुळे आम्ही सर्व सजग आहोत, आम्ही सर्वजण एकत्र असून हा संपूर्ण जिल्हा अजित पवार आणि छगन भुजबळ यांच्यासोबत असल्याचे राष्ट्रवादीच्या नेत्यांनी स्पष्टीकरण दिले आहे. मुंबईत बैठक असून यानंतर आमचा निर्णय होणार असल्याचे ते म्हणाले आहेत. त्यामुळे अद्यापही स्थानिक नेत्यांमध्ये संभ्रम असल्याचे चित्र आहे. एकीकडे बैठकीसाठी बोलवण्यात येत असताना दुसरीकडे शहरातील कार्यकर्ते आज बैठक नसून कुणीतरी खोडसाळपणा केल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे नेत्यांसह कार्यकर्ते देखील दोन बाजूने असल्याचे यावरून दिसून येत आहे.**

शरद पवार यांच्या बंडखोरीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी नाशिक येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, ही बैठक अजित पवार यांच्यासोबत न गेलेल्या विरोधी गटाने ठेवली होती. त्यामुळे अजित पवार गटाने त्या बैठकीआधीच पक्ष कार्यालयाचा ताबा घेतला आहे. या ठिकाणी कोणतीही बैठक होणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे दोन्ही गट समोरासमोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

नाशिक जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयाबरोबरच राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयावर देखील अजित पवार यांचे लक्ष आहे. हे सर्व कार्यालय ताब्यात घेण्याची रणनिती अजित पवार यांच्या वतीने आखली जात आहे. त्यानुसार अजित पवार यांच्या माध्यमातून सर्व जिल्हाध्यक्षांना फोन केले जात असल्याची माहिती समोर आली आहे.

राज्यातील बदललेल्या समीकरणांमुळे राष्ट्रवादी पक्षातही दोन गट पडल्याचे चित्र पाहायला मिळत आहेत. अजित पवार, छगन भुजबळ यांच्या बाजूने असलेल्या गटातील नेत्यांवर राष्ट्रवादीच्या मूळ पक्षाकडून कारवाई करण्यात येत आहे. कालच राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अंबादास खैरे यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. राज्यातील घडामोडींमुळे काल सायंकाळपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयाबाहेर शुकशुकाट होता. मात्र उशिरा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर अध्यक्ष खैरे यांच्यावर कारवाई करण्यात आली. यानंतर आज राष्ट्रवादी कार्यालयाजवळ स्थानिक नेत्यांनी जमायला सुरवात केली आहे. कार्यालयाबाहेर छगन भुजबळ यांच्या समर्थनार्थ बॅनर लावण्यात आले असून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अंबादास खैरे यांच्या कारवाईनंतर भुजबळ गट सक्रिय झाला असून राष्ट्रवादी कार्यालय बाहेर बॅनर लावण्यात आलेले आहेत, त्याचबरोबर अनेक नेते देखील या ठिकाणी उपस्थित झाले आहेत. मात्र यावेळी दिलीप खैरे म्हणाले की, आज कुठलीही बैठक बोलावलेली नसून आमची बैठक उद्या अकरा वाजता आहे. सुरुवातीला ते म्हणाले की, आम्ही शरद पवार, अजित पवार आणि छगन भुजबळ यांच्या सोबत आहोत. अजित पवार आणि शरद पवार यांच्या दोन बैठका उद्या होत असून कोणत्या बैठकीला जाणार? यावर ते म्हणाले की, आम्ही छगन भुजबळ यांच्या बैठकीला जाणार आहोत. आजच्या बैठकीची पोस्ट कोणीतरी खोडसाळपणे सोशल मीडियावर शेअर केले असून आज कुठलीही बैठक नसल्याचे यावेळी दिलीप खैरे यांनी स्पष्ट केले.



# धुळे महानगर माध्यमिक शिक्षक संघ व धुळे महानगर शिक्षक लोकशाही आघाडीची संयुक्त बैठक

**धुळे । प्रतिनिधी**

येथील धुळे जिल्हा माध्यमिक शिक्षक पतसंस्थेच्या सभागृहात शुक्रवार, दि. ३० जून २०२३ रोजी, धुळे महानगर माध्यमिक शिक्षक संघ व धुळे महानगर शिक्षक लोकशाही आघाडी ची संयुक्त बैठक आयोजन करण्यात आली होती.

बैठकीत अजेंडानूसार शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आलीसदर बैठकीच्या अध्यक्षस्थानी धुळे ग्रामीण शिक्षक लोकशाहीचे अध्यक्ष डी. जे. मराठे होते. बैठकीस माध्यमिक शिक्षक संघटनेचे जेष्ठ मार्गदर्शक प्राचार्य एस. के. चौधरी, संघटनेचे विभागीय अध्यक्ष संजय पवार, मुख्याध्यापक संघाचे विद्यासचिव उदय तोरवणे, धुळे महानगर माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष व्ही. टी. गवळे, एम. बी. मोरे, धुळे ग्रामीण माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष अजय भदाणे आदी मान्यवर विचारमंचावर उपस्थित होते. बैठकीत उभय संघटनेचे पदाधिकारी, सदस्य, ज्यांना मुख्याध्यापक पदी पदोन्नती मिळाली, ज्यांनी सेट परीक्षेत, शालेय व्यवस्थापन पदविका परीक्षेत यश संपादन केले, जे मुख्याध्यापक सेवानिवृत्त झाले, त्यांना मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मानित करण्यात आले. बैठकीत अजेंडानूसार शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी एस. के. चौधरी, संजय पवार, उदय तोरवणे आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

धुळे महानगर माध्यमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष व्ही. टी. गवळे यांनी प्रास्ताविक केले तर संघटनेचे कार्यवाह दिलीप पाटील यांनी बैठकीचे संयोजन करीत आभार प्रदर्शन केले. बैठकीत जे. बी. सोनवणे, गुलाबराव वाघ, कानिफनाथ सूर्यवंशी, हर्षल पवार, सुनील थोरात, एन्. यु. पाटील, विकास सोनवणे, सौ. मंगला बडगुजर, राजेंद्र बडगुजर, वर्षा भामरे, शितल कापूरे, एस. के. पाटील, पंकज सूर्यवंशी आदी कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

# योग्य काळजी, नियमित तपासणीतून नेत्र विकार ठेवा दूर- डॉ.पाटील

### लोकज्योती मंचच्या वर्धापनदिनी कार्यक्षम संघ पुरस्कार वितरण

**नाशिक । प्रतिनिधी**



वेगवेगळ्या वयोगटात वेगवेगळ्या स्वरूपाचे नेत्र विकार उद्भवत असतात. टीव्ही, मोबाईलमुळे वाढलेला स्क्रीन टाइमसह अन्य विविध कारणांनी नेत्रविकार होऊ शकतात. काचबिंदू केलेल्या दुर्लक्षामुळे अंधत्व येऊ शकते. योग्य काळजी घेतांना व दर वर्षी किमान एकदा तपासणी करून घेत नेत्रविकारांपासून बचाव करावा. असे आवाहन सुशिल आय केअर संचलित डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलचे संचालक ज्येष्ठ नेत्र विकार तज्ञ डॉ.शरद पाटील यांनी गुरुवारी केले.

लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंचचा वर्धापनदिन सोहळा परशुराम सायखेडकर नाट्यगृह येथे झाला. या कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी महापालिका माजी सभागृह नेते दिनकर पाटील, जगदीश पाटील, सत्यनारायण चौधरी, मंचचे अध्यक्ष रंजनभाई शाह, रमेश डहाळे, जितेंद्र येवले, देवराम सैंदाणे, भा.रा.सुर्यवंशी, वैशाली पिंगळे, कुमुदिनी कुलकर्णी आदी उपस्थित होते.

डॉ. शरद पाटील पुढे म्हणाले, माणसाचे डोळे हे कुठल्याही कॅमेऱ्यापेक्षा अधिक प्रभावी असतात. डोळ्यांच्या विकारातून मधुमेह, उच्च रक्तदाब यासह अन्य विविध आजारांचे निदान होऊ शकते. त्यामुळे नित्याने नेत्र तपासणी करणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाने उपचार पद्धती अधिक सुलभ केलेली असून रुग्णांना कमीत कमी त्रासात दर्जेदार उपचार करणे शक्य झालेली आहे. याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले.दिनकर पाटील म्हणाले, ज्येष्ठ नागरिक हे समाजाची संपत्ती आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा करून घेत सामाजिक विकास साधता येऊ शकतो. ज्येष्ठ नागरिक व त्यांच्यासाठी कार्य करणाऱ्या संघांना नेहेमी सहकार्य केले असून या पुढील काळात देखील असेच सहकार्य करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले.

या संघांना 'कार्यक्षम ज्येष्ठ नागरिक संघ' पुरस्कार प्रदान

कार्यक्रमात कार्यक्षम ज्येष्ठ नागरिक संघ' पुरस्कार प्रदान केले. यामध्ये जय मल्हार ज्येष्ठ नागरिक संघ (ओझर), ज्येष्ठ नागरिक संस्था मालेगाव कॅम्प व परिसर (मालेगाव) आणि भारतनगर ज्येष्ठ नागरिक संघ (नाशिक) या संघांचा समावेश होता. यावेळी प्रथमच ग्रामीण भागातील संघांना पुरस्कार दिला जात असल्याची माहिती रमेश डहाळे यांनी प्रास्ताविकात दिली.

भजनांनी केले मंत्रमुग्ध

आषाढी एकादशी निमित्त भजन संध्या हा कार्यक्रम देखील पार पडला. ओम भजनी मंडळतर्फे मिनाक्षी मेतकर व सहकारी आणि राधाकृष्ण भजनी मंडळतर्फे उज्वला वाणी व सहकारी यांनी भजन सादर केले. बाळकृष्ण दंडगांवकर, डी.एम. कुलकर्णी, कमला पणेर, प्रकाश महाजन, बापू अमृतकार, सविता चतूर, हरिश्चंद्र निंबाळकर, वसंतराव पुंड आदी उपस्थित होते.



# भोरखेडा येथील विद्यालयात कथाकथन स्पर्धेचे आयोजन

**शिरपूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील भोरखेडा येथील आर. सी.पटेल माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा निमित्त कथाकथन स्पर्धेचे आयोजन करून हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. एफ. शिरसाठ यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त गुरु व शिष्य यातील नाते कसे असते व गुरु हे नेहमी आपल्या शिष्या चा सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशिल असतात हे पटवून दिले.

विद्यालयातील पर्यवेक्षक सी.जी.पाटील यांनी देखील या प्रसंगी गुरूविषयी आपली भावना व्यक्त करतांना सांगितले की, आपल्याला गुरु हे नेहमी चांगल्या मार्गाने पुढे चालायला मागदर्शन करतात. त्यानंतर कथाकथन स्पर्धेला सुरुवात झाली स्पर्धेचे परीक्षण श्रीमती मिना पटेल व श्रीमती एश्वर्या मोराणकर यांनी करून विद्यार्थ्यांची निवड केली.

कथाकथन स्पर्धेतील विजयी विद्यार्थी प्रथम मीनल वाल्मीक पाटील, द्वितीय गुंजन उद्यम श्रीराव, तृतीय हर्षदा महेंद्र चौधरी, उत्तेजनार्थ धनगर हर्षल ईश्वर या विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा देण्यात आल्या.


सूत्रसंचालन श्रीमती दिपाली निकम यांनी केले व आभार चंदन पावरा यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एस. आर. देसले, एन. वाय.बोरसे, एन. डी. चव्हाण, एस.जे.पाटील, डी.आर.राजपूत, आर. जी.पाटील, सुभाष निकुंभे, जयवंत पाटील, तुषार पाटील, श्री. काझी व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# मुंबई नाक्यावर फुले दाम्पत्यांचे पुतळे बसविण्यासाठी कार्यवाही करा अन्यथा तीव्र आंदोलन छेडू

### अ.भा. महात्मा फुले समता परिषद व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून मनपा प्रशासनाला इशारा

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिक शहरातील मुंबई नाका परिसर (सावित्रीबाई फुले चौक) येथील मुख्य चौकात फुले दाम्पत्यांचे पुतळे बसविणेबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने मनपा प्रशासनाला दिला आहे. काल समता परिषद व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शिष्टमंडळाने मनपा प्रभारी आयुक्त भाग्यश्री बनायात यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष रंजन ठाकरे, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष दिलीप खैरे, बाळासाहेब कर्डक, प्रदेश पदाधिकारी नानासाहेब महाले, प्रदेश चिटणीस समाधान जेजुरकर, निवृत्ती अरिंगळे, मनोहर कोरडे, शहराध्यक्ष कविता कर्डक, राष्ट्रवादीच्या महिला शहराध्यक्ष योगिता आहेर, समता परिषदेच्या महिला शहराध्यक्ष आशा भंदुरे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष अंबादास खैरे, शहर सरचिटणीस संजय खैरनार, शशी हिरवे, मकरंद सोमवंशी, नाना पवार, अक्षय परदेशी, अमोल नाईक, रवींद्र शिंदे, मीनाक्षी काकळीज, कृष्णा काळे, त्रिभुवन, गिरीश बच्छाव, पुष्पलता राठोड, चैतन्य देशमुख, प्रशांत वाघ, रितेश केदार यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

मनपा आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, थोर समाजसुधारक क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य भावी पिढीला मार्गदर्शक ठरावे आणि त्यांच्या कार्याचा सन्मान करणेसाठी सावित्रीबाई फुले चौक, मुंबई नाका येथील मुख्य चौकात त्यांचे ब्रांझ धातूमधील संयुक्त पुतळे बसविण्याबाबत माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेने वेळोवेळी केलेली मागणी आजतागायत प्रलंबित आहे. या पुतळ्यांसाठी महानगरपालिकेच्या २०२२-२३ व २०२३-२४ च्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली आहे. त्याचप्रमाणे या पुतळ्यांसाठी आवश्यक असणारे सर्व विभागांचे ना हरकत दाखले नाशिक महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहेत. तसेच नाशिक महानगरपालिका,नाशिक यांच्या ठराव क्र.१३४ दि. १४.०३.२०२३ रोजी महासभेने ठराव मंजूर केलेला आहे. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे अजूनही सदर चौकात पुतळे बसविण्यात दिरंगाई होत असल्याबाबत लक्ष वेधले आहे.

# बोराडी येथे शिवणकला व कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ

**शिरपूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील बोराडी येथे मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट मार्फत कु. द्वेता भूपेशभाई पटेल यांच्या संकल्पनेतून युवती (महिला) शिवणकला व कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ करण्यात आला.

शिरपूर तालुक्याचे आमदार काशिराम पावरा यांच्या हस्ते तसेच शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या ट्रस्टी सौ. कृतिबेन भूपेशभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट मार्फत कु. द्वेता भूपेशभाई पटेल यांच्या संकल्पनेतून बोराडी परिसरातील होतकरू मुलींसाठी व महिलांसाठी युवती (महिला) शिवणकला व कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी भाजपा माजी तालुकाध्यक्ष राहुल रंधे, साहेबराव पाटील, शिरपूर पंचायत समिती सभापती प्रतिनिधी वसंत पावरा, जिल्हा परिषद सभापती प्रतिनिधी जयवंत पाडवी, जिल्हा परिषद सदस्य



सौ. जताबाई रमण पावरा, पंचायत समिती सदस्य सरिता पावरा, रमण भाऊसाहेब पावरा, राजेंद्र पाटील, मंजित पवार, नारसिंग वळवी, सरपंच सुकदेव भील, निलेश महाजन, पंचायत समिती माजी उपसभापती जगन पावरा, मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट समन्वयिका सौ. पोर्णिमा पाठक, डॉ. सुप्रिया पंतवैद्य, स्विय सहाय्यक सुनील जैन, विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ, भूपेशभाई पटेल फ्रेंड सर्कल, महिला, युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आमदार काशिराम पावरा म्हणाले, शिरपूर तालुक्यातील आदिवासी, महिला, दारिद्रय रेषेखालील घटकांना रोजगार मिळवून देत आर्थिक स्वावलंबी करण्यासाठी कु. द्वेता पटेल यांनी विविध योजना राबवल्या आहेत. परदेशात शिक्षण घेतांना त्यांनी या योजनांच्या अंमलबजावणीकडे लक्ष पुरवले आहे हे विशेष. दुर्गम आदिवासी भागातील महिलांना शिवणकामाचे प्रशिक्षण देऊन, त्यांना शिवण यंत्रे पुरवून कंपन्यांकडून शिलाईचे काम देऊ करत आर्थिक स्वावलंबनाचे नवे मॉडेल त्यांनी साकारले. 'माँ गंगा परसबाग मंडल' हे त्यांच्या कल्पकतेच्या सर्वोत्तम उदाहरण. आदिवासी महिलांमधील कुपोषणाची कारणे तज्ज्ञांच्या मदतीने शोधून त्यांना मंडल परसबाग योजनेत सहभागी करुन घ्यायचे, त्यांना उत्तम बियाणे, सेंद्रिय खते पुरवायची, पाणी पुरवठ्याची सोय करायची, फळभाज्या, वेलवर्गीय भाज्या व पालेभाज्यांचा हा मिश्र मळा त्या कुटुंबाच्या कुपोषणाचा प्रश्न तर सोडवतोच शिवाय अतिरिक्त भाजीपाला विकून त्यांच्या चरितार्थासाठी महत्त्वाचे साधन ठरतो, संपूर्ण महाराष्ट्रात परसबागेचे हे मॉडेल नावाजले गेले. कु. द्वेता पटेल यांच्या पुढाकारातून आर. सी.पटेल संकुलातील विद्यार्थ्यांना प्लास्टिक कचरा निर्मूलन अभियानात सहभागी करून घेण्यासाठी राबवलेले अभियान यशस्वीरित्या सुरू आहे. एक मुठ्ठी अनाज' हा धान्य बँक अनोखा उपक्रम द्वेता पटेल यांनी राबवला. वाढदिवसानिमित्त प्रत्येक विद्यार्थ्यांने ठराविक प्रमाणात धान्य शाळेतील धान्य बँकेत जमा करावे, त्यानंतर ते गरजूंना उपलब्ध करून दिले जाईल अशी संकल्पना या उपक्रमामागे आहे. उदात्त विचारसरणी कु. द्वेता पटेल यांच्यामधील सेवाभाव दाखवून देते, असे सांगून आमदार काशिराम पावरा यांनी कु. द्वेता पटेल यांचे तोंड भरून कौतुक केले. प्रास्ताविकात जगन टेलर यांनी मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट मार्फत संपूर्ण तालुक्यात खेडोपाडी चालविल्या जाणाऱ्या शिवण क्लास व कौशल्य विकास केंद्र विषयी सविस्तर माहिती दिली. मंजित पवार यांनी बोराडी येथे सुरू करण्यात आलेल्या शिलाई काम प्रशिक्षण केंद्राबद्दल पटेल परिवाराचे आभार मानले.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था Admission Open

विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे

NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111

B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.

डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत

संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A

B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.

सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.

प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798

शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053

P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology

पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.

संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344

प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735, प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# भरधाव कंटनेर हॉटेलमध्ये घुसला, १२ जण जागीच ठार
















धुळे।
मुंबई -आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील शिरपूर तालुक्यातील पळासनेरनजीक आज भीषण अपघात झाला. खडी घेऊन जाणाऱ्या भरधाव कंटेनरचे ब्रेक फेल झाल्याने दुचाकी, कारला उडवत थेट हॉटेलमध्ये शिरला. या अपघातात १२ जण ठार झाले असून २४ जण जखमी झाले आहेत. दरम्यान, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. दि ४ रोजी १२ वाजेच्या सुमारास हा भीषण अपघात झाला. जे ०९ जीबी ९००१ क्रमांकाचा कंटेनर हा मध्यप्रदेश राज्यातून खडी घेऊन जिल्ह्यातील नरडाणा एमआयडीसी येथे येत होता. पळासनेर गावानजीक अचानक ब्रेक फेल झाल्याने चालकाचा कंटेनर वरील ताबा सुटला. त्यानंतर कंटेनर रस्त्यावरील वाहनांना व नागरिकांना उडवीत थेट हॉटेलमध्ये शिरून उलटला. या भीषण अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच नागरिकांनी व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य केले. जखमींना तात्काळ जवळील व शिरपूर उपजिल्हा रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. जखमींमध्ये काहींची प्रकृती गंभीर आहे. दरम्यान पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. मुंबई-आग्रा महामार्गावर शिरपूर तालुक्यातील पळासनेर हे गाव मध्य प्रदेशच्या सीमेवर येतं. याच गावाजवळ साधारणतः दुपारी १२ वाजताच्या दरम्यान ही अपघाताची घटना घडली. एक कंटेनर महामार्गावरुन जात असताना त्याचा ब्रेक फेल झाला आणि तो थेट हॉटेलमध्ये शिरला.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक

लक्ष महाराष्ट्र





# अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना ५ लाखांची मदत













धुळे । जिल्ह्यातल्या मुंबई- आग्रा महामार्गावरील पळासनेर गावाजवळ झालेल्या भीषण अपघातात मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबीयांना सरकारने मदत जाहीर केली आहे. या अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाखांची मदत मुख्यमंत्र्यांनी जाहीर केली आहे. तसंच अपघातातील जखमींना तात्काळ वैद्यकीय उपचार देण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. पळासनेर येथे मुंबई- आग्रा महामार्गावर झालेल्या भीषण अपघाताबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शोक व्यक्त केला. या अपघातातील मृत आणि त्यांच्या कुटुंबियाप्रति मुख्यमंत्र्यांनी सहवेदना व्यक्त केल्या. तसंच अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीमधून प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.या अपघाताची माहिती मिळताच मुख्यमंत्र्यांनी धुळे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांशी दूरध्वनीवर संपर्क साधून या घटनेची माहिती घेतली. तसंच, मुख्यमंत्र्यांनी अपघातग्रस्तांना तातडीने मदत करण्याच्या सूचना देतानाच जखमींना तात्काळ वैद्यकीय उपचार पुरविण्याचे निर्देशही दिले. धुळे जिल्ह्यातल्या मुंबई- आग्रा महामार्गावर आज दुपारी १२ वाजता भरधाव कंटेनरचा अचानक ब्रेक फेल झाला. या कंटेनरने आधी कारला धडक दिली. त्यानंतर हा कंटेनर थेट हॉटेलमध्ये घुसला. या भीषण अपघातामध्ये कंटेनरखाली चिरडून १३ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर २० ते २५ जण जखमी झाले आहेत. हा भीषण अपघात सीसीटीव्हीत कैद झाला आहे.

संकलन : दिपक वाघ